प्रेसनोट दि.१४/०३/२०१९

दत्तवाडी पोलीस ठाणे,पुणे शहर

# दांडेकर पुल हल्ला प्रकरणातील आरोपी गणेश खालगावकर याला पोलीसांनी केलेजेरबंद

दिनांक ८ मार्च २०१९ रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास संदीप लक्ष्मण बोडके वय २९ राहणार मामाचा वाडा , मलठनफाटा,शिक्रापूर,जिल्हा पुणे हा स्वारगेट येथून रिक्षाने दांडेकर पूलपेट्रोल पंपाजवळ आला असता व त्याला उमरगा येथे आपल्या गावी जायचे असल्यानेसमोरील ट्रॅव्हल्स च्या बसची वाट पाहत असताना करण दगडू लंबाटे वय २१ वर्षराहणार सर्वे नंबर ३२ विश्वकर्मा गॅरेज जवळ ,दांडेकर पूल ,सिंहगड रोड , पुणेयाने त्याच्या हातातील मोबाईल जबरदस्तीने हिसकावून घेतला.व डोक्यावर फायटरमारून गंभीर जखमी केले व ज्या रिक्षातून तो स्वारगेट वरून दांडेकर पूल येथेआला त्या रिक्षा चालकाने त्याच्या पॅन्ट च्या उजव्या खिशातून रोख ७ हजाररुपये जबरीने काढून घेतले.व दोघांनी त्याला हात मागे बांधून ठेवले आणि करणदगडू लांबाटे याने रस्त्यावरील सिमेंट गट्टू फरशी उचलून डोक्यात मारूनगंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.ह्या बाबत दत्तवाडी पोलीसस्टेशन येथे वरील दोघां विरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर १५७/२०१९ भारतीय दंडविधान ३०७(जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे)३९४(प्राण घातक दुखापत करूनजबरी चोरी करणे)३९७ ,५०४,५०६,३४ प्रमाणे नोंदविण्यात आला असून त्या फराररिक्षा चालकाचा शोध घेणे पोलिसां समोर मोठे आवाहन होते.वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांनी तपास पथकातील पोलीसउपनिरीक्षक कुलदीप संकपाळ,पोलीस हवालदार रविंद्र फुलपगारे,अक्षयवाबळे,राहुल ओलेकर यांचे पथक तयार करून या आरोपीचा शोध मोहीम सुरूकेली.पोलीस पथकाने विविध ठिकाणी संशयित जागी आरोपीच्या लपण्याच्या जागांचीमाहिती काढून शोध घेतला पण त्यांना यश काही नजरेच्या सिमेत दिसत नव्हते.दिनांक १३ मार्च २०१९ रोजी पोलीस हवालदार रविंद्र फुलपगारे यांना त्यांच्यागुप्त बातमीदाराने माहिती दिली की ,दांडेकर पूल येथे झालेल्या हल्ल्यातीलआरोपी हा स्वारगेट ते धायरी अश्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षावर चालकम्हणून काम करत असून तो ना.सी.फडके चौक सदाशिव पेठ येथे सायंकाळी ६ वाजता येणार आहे.ही पक्की खबर मिळताच तपास पथकातील सर्व स्टाफ ना.सी.फडके चौकात वेग वेगळ्याठिकाणी सामान्य नागरिकां प्रमाणे आजूबाजूला त्याच्या पाळतीवर थांबले असतावरील नंबरची रिक्षा ६:३० वाजण्याच्या सुमारास ना.सी.फडके चौकातून पुढेजाताच पोलीस कॉन्स्टेबल अक्षय वाबळे यांनी रिक्षा थांबवुन बाजूला घेण्याससांगितली.रिक्षा चालकाला संशय आल्याने त्यांनी रिक्षा बाजूला लावूनरस्त्याच्या विरुद्ध बाजूने स्वतःला वाचविण्यासाठी रस्त्या मधून पळकाढला.त्याच्या पाठीमागे पोलीस पळत असताना त्यांनी निलायम थिएटर जवळीलसिल्वर लाईन बंगल्यात संरक्षण भिंती वरून उडी मारली त्याच्या पाठीमागेपोलीस कॉन्स्टेबल अक्षय वाबळे यांनी उडी मारली असता त्यांचा हाताला आणिपायाला जखमा झाल्या त्या अवस्थेत आरोपी गणेश खालगावकर राहणार एच ४०३राजेंद्र नगर महानगर पालिका कॉलनी पुणे याला ताब्यात घेऊन अटक केले.गणेशखालगावकर हा पोलीस रेकॉर्ड वरील गुन्हेगार आहे.वरील कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक कुलदीप संकपाळ,पोलीस हवालदार रविंद्र फुलपगारे ,अक्षयवाबळे,राहुल ओलेकर यांनी पार पाडली आहे.गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मंगेश साळवे करत आहेत.